बापट गुरुजी

# यशाच्या पायऱ्या

**कुठलेही लक्ष्य निश्चित करणे म्हणजेच संकल्प करणे होय. अध्यात्म असो वा व्यवहार, संकल्पपूर्तीचे यश हे पाच महत्त्वाच्या पायऱ्यांनी मार्गक्रमणा केल्यासच प्राप्त होते. यातील कुठल्याही पायरीवर मनुष्य अडकला तरी मग यशाचे शिखर सर करणे अवघड असते.**

यशप्राप्तीसाठी सर्वात पहिल्या पायरीवर येतो तो आत्मविश्वास. अर्थात स्वत:बद्दल वाटणारा विश्वास. जेव्हा एखादा मनुष्य प्रचंड आत्मविश्वासाने म्हणतो, 'हो, हे मी मिळवणारच!' तेव्हा तो लक्ष्यापर्यंत पोहोचण्याची शक्यता वाढलेली असते. प्रखर आत्मविश्वासामुळे सामान्य घरातला एखादा मुलगा राष्ट्रपती बनतो किंवा एखादा अपंग मनुष्य जगातले अत्युच्च पर्वतशिखर गाठतो. या सर्व किमया आत्मविश्वासामुळे घडतात. मनुष्यातला आत्मविश्वास जागृत करण्याचे सर्वात मोठे साधन म्हणजे परमेश्वराची आराधना होय. जेव्हा एखादा मनुष्य म्हणतो, 'माझ्याबरोबर ईश्वर आहे' तेव्हा त्याचा आत्मविश्वास निश्चितपणे वृद्धिंगत व्हायला सुरुवात होते. याउलट एखादा जर असे म्हणत राहिला की, 'नाही बुवा, हे कसे काय जमेल मला?' तर ईश्वर काय कोणीच त्याला मदत करू शकत नाही. अगदी पहिल्याच पायरीवरती हा मनुष्य नापास होतो.

एकदा आत्मविश्वास निर्माण झाला की पुढच्या पायरीवर येतो पुरुषार्थ. यश प्राप्तीचा निश्चय केलेल्या प्रत्येक स्त्री-पुरुषाने आत्मविश्वासाला कठोर परिश्रमाची जोड देणे आवश्यक असते तोच पुरुषार्थ होय. असा पुरुषार्थ जर तुमचा भूतकाळ असेल तर भाग्य हे तुमचा भविष्यकाळ असेल यात शंका नाही. प्रयत्नरूपी पुरुषार्थाची महती अनेक संतांनी निरनिराळ्या पद्धतीने सांगितली आहे. 'प्रयत्न वाळूचे कण रगडिता तेलही गळे', असे जेव्हा कविवर्य वामन पंडित लिहितात तेव्हा त्यांना 'प्रयत्नांना आत्मविश्वासाच्या सात्त्विक अहंकाराची योग्य जोड दिल्यानंतर कोणतीही गोष्ट असाध्य नाही' हा अर्थ अनुस्यूत असतो. पुरुषार्थामुळे, मनुष्याच्या कर्तृत्वामुळे भाग्य निश्चितपणे बदलू शकते. फक्त तिथे कर्त्या-करवित्या ईश्वरी तत्त्वाची जाणीव हरपू न देणे सर्वात महत्त्वाचे आहे. प्रार्थनेला पुरुषार्थाची यथार्थ जोड दिली की भूतकाळात आपणच निर्माण केलेल्या दुष्कर्मांच्या विषवेलींचे उच्चाटन होते आणि यशाचा राजमार्ग दृष्टोत्पत्तीस येऊ लागतो.

यशाच्या या राजमार्गावरची पुढची पायरी म्हणजे 'कोणाशीही तुलना न करण्याचा निश्चय'. सामान्य मनुष्य नकळतपणे स्वत:ची तुलना मित्रांबरोबर, शत्रुंबरोबर, शेजाऱ्यांबरोबर किंवा समाजातल्या कोणत्या तरी व्यक्तीबरोबर करीत असतो. 'याचे माझ्यापेक्षा बरे चाललेय' किंवा 'याचे किती वाईट चाललेय, त्यापेक्षा माझे बरे आहे बुवा' या आणि अशा प्रत्येक विषमतेच्या विचारांमुळे आपली ऊर्जा निष्कारण खर्ची पडत असते. प्रत्येकाबरोबर ज्याचे त्याचे प्रारब्ध कर्म, पुरुषार्थ आणि भाग्य असते आणि त्यानुसार त्याची जीवनातली मार्गक्रमणा सुरू असते. स्वत:ची तुलना दुसऱ्याशी करणे जितके



गैर आहे तितकेच स्वत:च्या कुटुंबातल्या व्यक्तींची तुलना इतरांबरोबर करणे हेसुद्धा गैर आहे. कारण दृश्य जसे आपल्याला दिसते तसे वास्तव असेलच याची खात्री नसते. त्यामुळे उगीच व्यक्ती-व्यक्तीची तुलना करून शक्तिव्यय आणि आत्मविश्वासाचे हनन करून घेऊ नये. आत्मशक्ती अशी फुकट घालवण्यापेक्षा ती ध्येयपूर्तीच्या विचारांकडे वळवणे अधिक हितकर असते.

प्रामाणिक आत्मशोधन ही यशाची चौथी पायरी आहे. अध्यात्मातील किंवा व्यवहारातील संकल्प पार पाडण्यासाठी आपण काय आणि कसे प्रयत्न केले आहेत याचा प्रामाणिक शोध प्रत्येकाने वेळोवेळी घेतला पाहिजे. महाभारतात एक गोष्ट आहे. धर्मराजाला त्याच्या गुरूंनी क्रोधावर विजय मिळविण्याचा मूलमंत्र दिला. त्यानंतर अनेकवार विचारणा करूनही धर्मराजा त्या मंत्राचा इप्सित परिणाम झाल्याची ग्वाही जेव्हा देईना तेव्हा सर्वांदेखत गुरूंनी धर्मराजाच्या श्रीमुखात लगावली. या घटनेने स्तब्ध झालेल्या सर्वांसमोर धर्मराजा शांतपणे म्हणाला, 'आता मी निश्चितपणे सांगू शकतो की मी क्रोधावर विजय मिळविला आहे' असे चोखपणे केलेले आत्मशोधन ही आध्यात्मिक यशाची मोठीच गुरुकिल्ली आहे.

यानंतर येणारी सर्वात महत्त्वाची आणि श्रेष्ठ पायरी म्हणजे 'अत्युच्च लक्ष्यापर्यंत खेदविरहित वाटचाल'. सर्वस्व देऊ पाहणाऱ्या ईश्वराकडे सामान्य मनुष्य फाटकी झोळी घेऊन जातो आणि चुरमुरे मागतो यासारखा दैवदुर्विलास दुसरा नाही. जर आपले लक्ष्यच खुजे असेल तर त्यापर्यंत पोहोचूनही आपल्याला जीवनातली उदात्तता व भव्यता कळणार नाही. प्रत्येक मनुष्य विद्यार्थीदशेत उत्तम शिक्षणाची, तरुणपणी अनुरूप जोडीदाराची आणि नोकरीची त्यानंतर निरोगी अपत्यप्राप्तीची आणि सांसारिक स्थैर्याची इच्छा बाळगून त्या इच्छांचा आयुष्यभर पाठलाग करीत असतो. प्रत्येक वेळी या सगळ्या इच्छा पूर्ण होतीलच असे नाही. कारण मनुष्याला मिळणाऱ्या व्यावहारिक सुखामागे कर्मनियमांची कारणे असतात. अनेकवार तर इच्छापूर्ती न होणे हेसुद्धा कालांतराने हिताचेच ठरल्याचे लक्षात येते, परंतु व्यावहारिक सुखातल्या अशाश्वतेचे आकलन होईपर्यंत मनुष्याची बरीच शक्ती अपेक्षाभंगाच्या दु:खात खर्च झालेली असते. आयुष्यात येणारी सुख-दु:ख ही प्रारब्धानुसार येत आहेत त्याविषयी खेद न करता, परमार्थातले शाश्वत सुखाचे अत्युच्च शिखर कसे गाठता येईल याचा विचार सतत करणे ही यशाची अंतिम पायरी आहे. या पायरीवर पोहोचून खेदविरहित अंत:करणाने जर आपण म्हणत राहिलो, 'कुठल्याही संकटामुळे मी डळमळीत होणार नाही, माझी निष्ठा ढळणार नाही, माझी भक्ती बदलणार नाही' तर भगवंत स्वत: तुमच्या पायरीवर येऊन तुम्हाला भक्तिमार्गावरच्या चढत्या क्रमाने येणाऱ्या प्रत्येक पायरीवर घेऊन जातो. मात्र गमतीचा भाग असा की, शेणातल्या किड्याला त्या शेणाची इतकी सवय झालेली असते की त्यापेक्षा उच्च कोटीचे सुख मिळविण्याचे लक्ष्यच तो ठेवत नाही, असा संकल्पच घडत नाही तर मग शेणातून बाहेर पडण्यासाठी प्रयत्न करणे लांबच राहिले. ■